Dowmloaded from SkillCouncils.com


# महाराष्ट्र शासन
# आदिवासी विकास विभाग

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,
## नाशिक, जि.नाशिक.

आदिवासी विकास भवन, पहिला मजला, त्र्यंबकनाका, गडकरी चौक नाशिक 422002.

Email ID :-poitdp.nsk-mh@gov.in ☎ : 0253- 2577410

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक व कळवण यांच्या कार्यक्षेत्रातील नाशिक जिल्ह्यातील शाळा सोडलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण पुनर्समावेशन व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.

**सन 2025-26.**

**(ई-निविदा)(प्रथम मुदतवाढ)**

Downloaded from SkillCouncils.com


**ई- (निविदा)(प्रथम मुदतवाढ)**

**निविदा सुचना**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक व कळवण यांच्या कार्यक्षेत्रातील नाशिक जिल्ह्यातील शाळा सोडलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण पुनर्समावेशन व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे कार्यक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. त्यासाठी सेवाभावी स्वयंसेवी संस्था, विश्वस्थ मंडळ, शैक्षणिक संस्था, व्यावसायिक प्रशिक्षण प्रदाते (VTP) आणि अन्य संबंधित संस्थांकडून सन 2025-26 या शैक्षणिक सत्रात प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक हे दोन लिफाफा पध्दतीनुसार ई निविदा वरील निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन खुल्या ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | निविदेचे नांव | निविदेची अंदाजित रक्कम रुपये | निविदा फॉर्मची किंमत | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | नाविन्य पूर्ण योजनेंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक व कळवण यांच्या कार्यक्षेत्रातील नाशिक जिल्ह्यातील शाळा सोडलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण पुनर्समावेशन व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे. | रू. 10.00 लक्ष | **रु. 3,800/- नापरतावा** | **रू. 19,000/-** |

**महत्वाच्या सुचना**

1. निविदा ई-निविदा प्रणालीचा https://mahatenders.gov.in या Portal वर ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. अपूर्ण व अटींची पुर्तता न केलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
2. निविदेतील ऑनलाईन अपलोड केलेली सर्व कागदपत्रे सही शिक्यानिशी स्व-साक्षांकीत करणे आवश्यक आहे.
3. निविदेच्या वेळापत्रकानुसार निविदा उघडणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास खरेदी समिती निश्चित करेल त्या दिनांकास निविदा उघडण्यात येतील या निविदेबाबत यापुढे दिलेल्या अटी व शर्ती व्यतीरिक्त काही अटी व शर्ती यांचा समावेश करण्याचा अधिकार खरेदी समितीने राखुन ठेवला आहे. व अशा अतीरिक्त अटी शर्तीचा समावेश पुरवठा आदेशात व करारनाम्यात समावेश करण्यात येईल. तसेच निविदेतील खरेदीची रक्कम व साहित्य / वस्तु हया अंदाजित असून त्यामध्ये प्रत्यक्ष वस्तु/साहित्य, सेवा ची मागणी परिमाणानुसार कमी अधिक बदल होऊ शकेल याची नोंद घ्यावी.
4. सर्व इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीचा https://mahatenders.gov.in या संकेत स्तरावरील कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.
5. सर्व इच्छुक निविदा कारांना सूचित करण्यात येते की, सदर निविदेची कार्यवाही ऑनलाईन पध्दतीने पार पाडण्यात येईल. काही तांत्रीक अडचणी उद्‌भवल्यास वेबसाईट https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरील मदत केंद्रावर संपर्क करावा. इंटरनेट, विद्युतपुरवठा किंवा संगणक बिघाड इत्यादी कारणांमुळे निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. तसेच वरील वेळापत्रकानुसार त्या त्या स्तरावर कार्यवाही यशस्वीरित्या पूर्ण करावयाची जबाबदारी ही निविदाकारांची राहील. ईमेल, फॅक्स, हस्तेपोच इत्यादी द्वारे सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
6. सदर निविदा मंजूर करणे, त्यामधील अटी व शर्तीमध्ये वाढ करणे किंवा शिथील करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रीयेत बदल करणे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रीया रद्द करणे व इतर बाबतचे संपूर्ण हक्क व निर्णय प्रकल्प अधिकारी, ए. आ.वि.प्र., नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.
7. एकापेक्षा जास्त पुरवठादाराची नेमणूक करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.
8. सदची निविदा कोणतेही कारण न देता ऐखादी किंवा सर्व निविदा प्रक्रिया कुठल्याही स्तराचवर पूर्णतः अथवा अंशतः मंजूर करण्याचा किंवा ना मंजूर करण्याचा अधिकार हा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक यांना राहतील.

(अर्पित चौहान, भा.प्र.से.)
सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
नाशिक.

Downloaded from SkillCouncils.com


## लिफाफा क्रमांक 1 (तांत्रीक लिफाफा)

## -: तांत्रीक लिफाफा मधील आवश्यक कागदपत्रे :-

अत्यावश्यक कागदपत्रे (तांत्रिक लिफाफा) सदर निविदेमध्ये खाली नमुद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिका-याने दिलेले कागदपत्र लिफाफा क्र.1 (तांत्रिक लिफाफा) सोबत स्वसाक्षांकित व स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.

1. सदर निविदेत भाग घेणारे निविदा धारक हा स्थानिक व आदिवासी असल्यास जातीचा दाखला जोडावा.
2. संस्था नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत.
3. व्यवसाय कर निपटारा प्रमाणपत्र माहे मार्च 2025 अखेरचे.
4. पॅन कार्ड ची छायांकित प्रत.
5. सन 2021-22, 2022-23 व सन 2023-24 अखेरचे आयकर विवरणपत्र व संस्था असल्यास लेखापरिक्षण अहवाल.
6. निविदाधारकाने सन 2021-22, 2022-23 व सन 2023-24 या तीन वर्षातील वार्षिक उलाढाल 10.00 लक्ष असलेबाबतचे सनदी लेखापाल (CA) यांचे प्रमाणपत्र जोडावे. (UDIN NO. सह)
7. वस्तू व सेवाकर अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (GST नोंदणी) मार्च 2025 चे GST भरणा केल्याची प्रत जोडावी.
8. निविदाधारकाने रु.500/- च्या मुद्रांकावर सदर संस्था/ निविदाधारक केंद्रशासन अथवा राज्यशासन यांचे कडून कधीही काळया यादीत टाकण्यात आली नाही तसेच सदर संस्थेस निविदाधारक यांचेवर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारच्या फौजदारी गुन्हा दाखल नाही असा करारनामा करून द्यावा. (नमुना क्रमांक 1)
9. सदर निविदेत भाग घेणे, निविदेची कागदपत्रे सादर करणे, बैठकीस उपस्थित राहणे तसेच निविदेतील कामकाज पाहण्यासाठी प्रतिनिधीस प्राधिकृत केल्याचे प्रमाणपत्र. (नमुना क्रमांक 2)
10. तांत्रिक निविदा फॉर्म (साक्षांकनासह)
11. निविदा अर्ज शुल्क रु. 3,800/- (अक्षरी रुपये तीन हजार आठशे रुपये फक्त) व बयाणा रक्कम रु. 19,000/- (अक्षरी रुपये- एकोणीस हजार हजार रुपये फक्त) दोन्ही स्वतंत्ररीत्या नेटबँकीग सुविधा असलेल्या बँकेखात्यातुन स्वखर्चाने Online Payment / RTGS/ NEFT याव्दारे ई-पेमेन्ट अथवा धनार्कर्ष (DD) व्दारे AO TO PO ITDP Nashik यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडीया खाते क्र. 10980248656 (IFSC Code-SBIN0001469) मध्ये निविदा कालावधीत भरणा करुन ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच धनार्कर्ष (DD) व्दारे भरणा करण्यात येणारी रक्कम निविदेच्या अंतिम दिनांका पूर्वी या कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी ही निविदाधारक यांची असेल. निविदाधारकाचे धनार्कर्ष (DD) कार्यालयात तसेच Onlne Payment / RTGS/ NEFT व्दारे या कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी खात्यात निविदा फॉर्म शुल्क व बयाना रक्कम मुदतीत जमा न झाल्यास सदर निविदाधारकाची निविदा अपात्र करण्यात येईल. शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग दि. 1.12.2016 मधील परिच्छेद क्र.6.8 परिशिष्ट 8 मधील अनु. क्र. 1. सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम-2006 अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्या पासुन सुट देण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या सेवेसाठी निविदा मागविण्यात आली आहे, त्याकरीता बयाणा रक्कम व निविदा शुल्क सूट असल्याचे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग संचालनालयातील (MSMEDI) महाव्यवस्थापक प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र किंवा राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळाचे (NSIC) प्रमाणपत्र सादर करावे. केवळ MSME चे नोंदणी प्रमाणपत्र सुट मिळविणे करीता ग्राह्य धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी.
12. शासनास अथवा निम शासकीय कार्यालयांना विषयानुरूप काम केल्याचा अनुभवाचा दाखला जोडण्यात यावा. मागील तीन वर्षाचा संबंधीत कामाचा दाखला.

टीप:- निवीदाकाराने वर नमुद केल्यानुसारच सर्व कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रा शिवाय पर्यायी कागदपत्र स्विकारले जाणार नाहीत.

Dowmloaded from SkillCouncils.com


**प्रस्तावासाठी विनंती (RFP)**

नाशिक जिल्ह्यातील शाळा सोडलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण पुनर्समावेशन व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी

1. पार्श्वभूमी व उद्दिष्ट :-

महाराष्ट्रातील विविध सेवाभावी संस्था शिक्षणापासून दुरावलेल्या लहान मुलांसाठी वेगवेगळे उपक्रम राबवून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे मोलाचे कार्य करीत असतात. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक, यांच्या वतीने नाशिक जिल्ह्यातील शाळा सोडलेल्या आदिवासी मुला-मुलींसाठी एक सर्वसमावेशक, पुनर्समावेशन आणि कौशल्यविकास कार्यक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. त्यासाठी सेवाभावी स्वयंसेवी संस्था, विश्वस्थ मंडळ, शैक्षणिक संस्था, व्यावसायिक प्रशिक्षण प्रदाते (VTP) आणि अन्य संबंधित संस्थांकडून प्रस्तावासाठी विनंती (RFP) मागविण्यात येत आहे.

1. प्राथमिक सर्वेक्षणानुसार, नाशिक जिल्ह्यात अंदाजे २५० ते ३०० विद्यार्थी विविध कारणांमुळे इयत्ता १ ली ते इ १० वीच्या दरम्यान शाळा सोडलेले आहेत आणि ते ११० वर्षांपासून शिक्षण व्यवस्थे बाहेर आहेत. सदरचा कार्यक्रम बहुआयामी पध्दतीने राबविला जाणार असून, यामध्ये लहान मुलांसाठी ब्रिज कोर्सेस, मोठ्या वयाच्या मुलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि गरजेनुसार व इयत्तेनुसार परत शिक्षणाच्या प्रवाहात आणणे इत्यादीं सारख्या प्रकल्पांचा समावेश असेल.

2. **कार्याची व्याप्ती (Scope of Work) :-**

निवड झालेल्या संस्थेकडून पुढील कामे अपेक्षीत आहेतः

a. लहान विद्यार्थ्यांसाठी ब्रिज कोर्सेस

इयत्ता ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ब्रिज कोर्सेस तयार करणे व राबविणे.

विद्यार्थ्यांना वयानुरूप इयत्तेत प्रवेश घेण्यास तयार करणे.

स्थानिक शाळांशी समन्वय साधून प्रवेश प्रक्रिया सोपविणे.

शिक्षण साहित्य, दृक-श्राव्य माध्यमांचा वापर व समुदाय सहभागासह शिक्षण.

b. मोठ्या विद्यार्थ्यांसाठी ब्रिज कोर्सेस किंवा व्यावसायिक प्रशिक्षण

१४ वर्षांवरील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे.

गुणवत्ता व रस तपासणी (aptitude mapping) करून प्रशिक्षण निवड.

विद्यार्थ्यांना प्रमाणित अभ्यासक्रम देणे व प्रमाणपत्र प्रदान करणे.

नोकरी/स्वयंरोजगारासाठी संधी निर्माण करणे.

c. मूल्यमापन व प्रमाणपत्र

प्रारंभिक व अंतिम चाचणी घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन करणे.

शक्य असल्यास महाराष्ट्र राज्य मंडळ किंवा NIOS मार्फत परीक्षा व प्रमाणपत्र देणे.

d. समुदाय व पालक सहभाग

जागृती शिबिरे, पालक मार्गदर्शन सत्र आयोजित करणे.

शालेय गळती रोखण्यासाठी दीर्घकालीन योजना तयार करणे.

3. **अपेक्षित परिणाम (Expected Outcomes)**

लहान विद्यार्थ्यांपैकी कि मान ७०% विद्यार्थ्यांचे पुन्हा शाळेत प्रवेश.

मोठ्या विद्यार्थ्यांपैकी ८०% हून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण पूर्ण करून प्रमाणपत्र.

सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व नोंदणीकृत प्रगती अहवाल प्रदान.

Dowmloaded from SkillCouncils.com


## सर्वसाधारण अटी व शर्ती

1. निविदा दर केवळ व्यापारी लिफाफ्यातील विहीत नमुन्यात सादर करणे बंधनकारक असून निविदेत अन्यत्र दर प्रदर्शित केल्यास अशी निविदा अपात्र ठरु शकेल.

2. निविदा उघडतांना प्रथम लिफाफा क्र.1 (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात येवून त्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची व अटी / शर्तीची पूर्तता केली असल्याची खातरजमा करण्यात येईल. तांत्रिकदृष्टया सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणा-या निविदाधारकाचा लिफाफा 2 (व्यापारी लिफाफा) ठरलेल्या दिवशी/प्रस्तावित दिवशी उघडण्यात येईल. लिफाफा क्र.1 (तांत्रिक लिफाफा) मधील आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची / अटी व शर्तीची पूर्तता न करणा-या अशा निविदाधारकांचे लिफाफा क्रमांक 2 (व्यापारी लिफाफा) उघडण्यात येणार नाही व त्यांची निविदा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3. निविदा जाहीर करणाऱ्या प्राधिकाऱ्याने दरपत्रक लिफाफा उघडण्यापूर्वी तांत्रिक लिफाफ्याचे मूल्यांकन केले असल्याने दरपत्रक लिफाफा उघडण्यापूर्वी निविदेशी सबंधित पुनर्विलोकनासाठी अर्ज आणि लेखी आक्षेप फक्त अशा निविदाधारकाकडून करता येवू शकेल, ज्यांची तांत्रिक निविदा स्विकाहार्य असल्याचे प्राधिकाऱ्यास आढळून आले असेल. व्यापारी लिफाफा उघडल्यानंतर कोणत्याही निविदाधारकाचा कोणताही आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही वा त्यासबंधी कोणताही पत्रव्यवहार स्विकारण्यात येणार नाही.

4. ई-निविदेतील लिफाफा क्रमांक-2 (व्यापारी लिफाफा) उघडल्यानंतर न्युनतम दर असलेल्या निविदाधारकास अखेरच्या क्षणी माघार घेता येणार नाही.

5. बयाणा/ सुरक्षा, अनामत रक्कम यावर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. तसेच देयकाची रक्कम अदा करण्यास तरतुदी अभावी तथा अन्य कारणामुळे विलंब झाल्यास त्यावरही कोणतेही व्याज मिळणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

6. निविदेत खोटी कागदपत्रे सादर केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल व बयाणा रक्कम जप्त केली जाईल. तसेच काळ्या यादीमध्ये त्या संस्थेचा / फर्मचा समावेश करण्यात येईल.

7. निविदा मंजूर झाल्यास मंजूर निविदाधारकाने एकूण अंदाजित रकमेच्या 3% रक्कम सुरक्षा अनामत ठेव प्रकल्प कार्यालयात ठेवावी लागेल व तसेच अटी-शर्ती मान्य असल्याचा करारनामा 500/- रुपयांच्या मुद्रांक पेपरवर (स्टॅम्प पेपरवर) करुन द्यावा लागेल. तसेच करारनामा करणेसाठी आवश्यक मुद्रांक शुल्क महाराष्ट्र स्टॅम्प ॲक्ट 1958 कार्यारंभ आदेशाच्या मुल्यावर नियमानुसार येणारा खर्च ई-चलनाव्दारे भरणा करुन चलनाची मुळ प्रत या कार्यालयास सादर करावी लागेल. उक्त रकमेवर कोणतेही व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

8. ज्यांनी निविदा भरली आहे व मंजूर झाली आहे, त्यांनाच काम पूर्ण करावे लागेल. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत दुय्यम यंत्रणा नेमू नयेत.

9. निविदेतील प्रशिक्षणाचे दर प्रचलित शासन नियम विचारात घेवूनच आवशक्यतेनुसार वाटाघाटी करण्यात येवून अंतिम करण्यात येतील. तसेच एकापेक्षा जास्त निविदाधारकांना दर/काम विभागून देण्याचे अधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक, जि. नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.

10. देयकातून शासन नियमानूसार विहित करांची कपात करण्यात येईल.

11. निविदा धारकास कोणत्याही कारणास्तव मध्येच काम बंद करता येणार नाही व मंजूर झालेले दर कोणत्याही कारणास्तव वाढवून मिळणार नाहीत.

12. सदर निविदेत आदिवासी संस्था/ स्थानिक संस्था यांनी निविदेतील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करत असल्यास उक्त संस्थेस प्राधान्य देणे किंवा सदर बाबत उचित निर्णय घेण्याचा सर्वाधिकार प्रकल्पस्तरीय समितीने राखून ठेवला आहे.

13. योजनेच्या लक्षांकात व रक्कमेत बदल करण्याचे अधिकार प्रकल्प अधिकारी यांचे राहतील.

14. सदर निविदा कोणत्याही कारणास्तव नाकारण्याचा, पुन्हा मागविण्याचा तसेच निविदा सूचनेत नमुद केलेल्या अटी-शर्ती शिथिल व अर्थ लावण्याचा सर्वाधिकार प्रकल्प अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

15. निविदा प्रक्रियेबाबत काही वाद उद्भवल्यास शासनाचा निर्णय अंतिम राहील अथवा न्यायालयीन कार्यक्षेत्र जिल्हा सत्र न्यायालय नाशिक, जि. नाशिक राहील.

Dowmloaded from SkillCouncils.com


16. निविदा अर्ज रक्कम ही नापरतावा असेल, काही कारणास्तव निविदा रद्द झाल्यास ती परत केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
17. योजना राबवून पूर्ण झाल्याशिवाय संबंधीत संस्थेला कोणतेही अनुदान मिळणार नाही.
**18. निविदापूर्व बैठक दिनांक 04.07.2025. रोजी सकाळी 11.00 वाजता आयोजित करण्यात येईल**
19. निविदेमध्ये नमुद केलेल्या सर्व सेवांचा तपशील / अहवाल / कार्यपद्धती / नियोजन / आखणी इ. बाबतचा दस्ताऐवज या कार्यालयात जमा करण्यात यावा. तसेच सदर साहित्य सादर करणेसाठी येणारा सर्व खर्च हा निविदा धारकांने करण्यात यावा.

(स्वाक्षरित/-)
(अर्पित चौहान, भा.प्र.से.)
सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
नाशिक.

उपरोक्त अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य असून बंधनकारक राहतील करिता स्वाक्षरी केली आहे.

**ठिकाण -**
**दिनांक -** निविदाकाराची **स्वाक्षरी /नांव शिक्का**

Downloaded from SkillCouncils.com


**प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी**
आदिवासी विकास भवन, पहिला मजला, त्र्यंबक नाका, गडकरी चौक नाशिक 422002
☎०२५३- 2577410 Email ID :- poitdp.nsk-mh@gov.in

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व्यवस्था उभारणे. सन 2025-26.
व्यापारी/ दरपत्रक लिफाफा क्रमांक 2

| **अ.क्र** | **योजनेचे नाव** | **सर्व बाबीसह दर प्रति प्रशिक्षणार्थी सर्व करासहीत (रक्कम रूपयात)** |
|---|---|---|
| 1 | नाविन्य पूर्ण योजनेंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक व कळवण यांच्या कार्यक्षेत्रातील नाशिक जिल्ह्यातील शाळा सोडलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण पुनर्समावेशन व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.<br>सन 2025-26 सर्व बाबी व करासहीत (रक्कम रूपयात) | सदरबाबतचे दर हे ऑनलाईन स्वरुपात BOQ मधील फॉरमॅट मध्ये भरण्यात यावे. |
| | **एकूण** | |

1. निविदा फॉर्म मध्ये नमुद सर्व अटी-शर्ती मी वाचल्या असुन त्या मला समजल्या आहेत. सदर अटी-शर्ती माझ्यावर बंधनकारक आहेत.

**ठिकाण :-** **निविदाधारकांची सही**
**दिनांक :-** **निविदाधारकांचे नांव**

Dowmloaded from SkillCouncils.com


**Annexure A**

**नाविन्य पूर्ण योजनेंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक व कळवण यांच्या कार्यक्षेत्रातील नाशिक जिल्ह्यातील शाळा सोडलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण पुनर्समावेशन व व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेसाठी निश्चित केलेले क्षेत्र:-**

| अ.क्र. | जिल्हा | प्रकल्प कार्यालय | तालुका |
|---|---|---|---|
| 1 | नाशिक | नाशिक | त्र्यंबकेश्वर |
| 2 | नाशिक | नाशिक | पेठ |
| 3 | नाशिक | नाशिक | इगतपुरी |
| 4 | नाशिक | कळवण | सुरगाणा |

टिप :- वरील नमुद तालुक्यांतील विविध कारणांमुळे शाळा सोडलेल्या 209 विद्यार्थ्यांसाठी सदरची योजना राबविणे आहे.

Downloaded from SkillCouncils.com

**नमुना क्र.** 1

**प्रतिज्ञापत्र**

**दिनांक** : / /

**प्रति,**
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
नाशिक जि.नाशिक.

मी, प्रतिज्ञेवर सादर करतो की, प्रशिक्षण देणेबाबतच्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत.

निविदेत सादर केलेली सर्व कागदपत्रे सत्य व खरी असुन त्यात कोणतेही फेर-फार केलेली नाही. तसेच मी अथवा माझ्या संस्थेने यापुर्वी कोणत्याही शासकीय, निम शासकीय, शासन अंगीकृत कार्यालयात निविदेसाठी सादर केलेली कागदपत्रे सत्य व खरी सादर केलेली असुन त्यात कोणतेही फेर-फार केलेली नाही. याबाबतची हमी देत आहे. निविदेत नमुद केलेले दर हे विना अट आहेत.

तसेच मला अथवा माझ्या संस्थेस कोणत्याही शासकीय, निम शासकीय, शासन अंगीकृत उपक्रमाने काळया यादीत समाविष्ट केलेले नाही वा अशी कारवाई प्रगतीत / प्रस्तावित नाही.

बालमजुरी, कामगार कायदे, लैगिंक पिळवणुक, मानवाधिकार ई. विषयी आवश्यक धोरणाचेही आमच्याकडुन पालन होते.

वरील नमुद सर्व माहिती मान्य असुन यात चुक आढळल्यास मी कारवाईस पात्र असेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

शासनाने अंतिमत: मंजूर केलेले दर मला मान्य राहतील याबाबत माझी काहीही हरकत राहणार नाही.

निविदाकाराची स्वाक्षरी / नाव तपशिल

**टिप : वरील पतिज्ञापत्र रुपये 500 च्या मुंद्रकावर सादर करणे आवश्यक आहे.**

Dowmloaded from SkillCouncils.com


**नमुना क्र.** 2

**दिनांक** : / /

प्रति,
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
नाशिक जि.नाशिक.

विषय : ..........................................................................

महोदया,

आम्ही........................................................... एक नावाजलेली प्रशिक्षण संस्था असून..............................................या ठिकाणी काम करीत आहोत. या संदर्भात आम्ही ...................................................................... यांना निविदा प्रक्रियेत भाग घेणे, दर ठरविणे, प्रकल्प स्तरीय समिती बैठकीस उपस्थित राहणे यासाठी सर्वस्वी अधिकार या विशेष निविदा क्रमांक .......................... साठी देत आहोत.

आपला विश्वासू

प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी

निविदाकाराची **स्वाक्षरी/ नांव व तपशिल**